म्युझिक थेरपी इंटरनॅशनलला हे कळविण्यात आनंद होत आहे की, मेलबर्न म्युझिक थेरपी विश्वविद्यालय आणि कॅथोलिक हेल्थ असोसिएशन, भारत यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणादायी स्त्रोत आपल्या सोबत सामायिक करण्यात येत आहे. विविध वयातील अपंगांसाठी संगीताचा वापर करण्यासाठी ज्या मार्गदर्शकांना विशेष आवड आहे त्यांच्यासाठी हे बनविले आहे. सदर प्रोजेक्ट स्वतंत्ररीत्या थेरपी इंटरनॅशनल म्युझिक म्हणून सादर केला गेला होता, परंतु यामध्ये असलेले सर्वोत्कृष्ट स्त्रोत हे आमच्या जगभरातील भागीदारांसाठी अत्यंत अनुकूल आहेत, हे स्त्रोत आमच्या ग्रंथालयात जोडताना आम्हाला अभिमान वाटत आहे (इंग्रजी, हिंदी, मराठी, तामिळ, बंगाली, तेलगू आणि नेपाळी भाषेमध्ये उपलब्ध).

ही माहितीपत्रके आरोग्य कर्मचारी, अपंग सहाय्यक, अपंग उपचार देणारे, अपंग काळजीवाहक आणि/ किंवा त्या संदर्भातील प्रशिक्षण देणाऱ्या लोकांसाठी त्यांना अपंग संदर्भातील सेवा वापरकर्ते/ दिव्यांग असणाऱ्या लोकांसाठी तयार केली गेली आहे, ज्यांना त्यांच्या कामामध्ये संगीताचा वापर करायचा आहे. ही पत्रके सोप्या आणि व्यावहारिक पद्धतीने माहिती देतात ज्यामध्ये संगीत चिकित्सा/ प्रशिक्षण सेटिंग्स यांचा समावेश होतो आणि, यामध्ये चिकित्सा पद्धती व शैक्षणिक ध्येय साध्य करताना संगीताचा कशा पद्धतीने वापर करावा याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

ही माहिती पत्रके महाराष्ट्र, भारतातील कम्युनिटी- आधारित रिहॅबिलेशन (सीबीआर) सेवाप्रदाता आणि समुदाय सदस्य यांच्या संशोधनातून विकसित केली गेली आहेत. या संशोधनातून आढळले आहे की अपंग मुले आणि त्यांच्या कुटुंबांना त्यांची विकासात्मक, सामाजिक आणि शारीरिक ध्येय साध्य करणे हे संगीताच्या समावेशामुळे सहाय्यक ठरले आहे. संगीताच्या समावेशामुळे या कुटुंबांना त्यांच्यासारख्याच इतर कुटुंबांसोबत आणि विस्तीर्ण समुदायासोबत जोडले जाण्यासाठी मदत झाली, यामधून त्यांना उच्च प्रकारची प्रेरणा मिळाली आणि चिकित्सात्मक पद्धतीमधील सहभाग नोंदवता आला, सोबतच त्यांचा आनंद व उत्साह वाढला!

या आमच्या कल्पना विस्तृत प्रमाणावर सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही या माहितीपत्रकांचा अनेक भाषांमध्ये अनुवाद केला आहे. ज्या लोकांना अपंगांसाठी काम करायचे आहे किंवा त्यांची काळजी घ्यायची आहे अशा सर्वांना आम्ही या सर्व कल्पना सामायिक आणि आत्मसात करण्यासाठी आमंत्रित करत आहोत.

या प्रेरणादायी माहितीपत्रकांच्या प्रकल्पाविषयी अधिक माहितीसाठी खालील लिंक्स पहा:

प्रोजेक्टची व्हिडीओ संक्षिप्त माहिती:
https://www.youtube.com/watch?v=OYH_WYegH54&t=5s


प्रकल्पातील मुक्त वापर असणाऱ्या लेखांविषयीचे वाचन:

1. संगीताच्या माध्यमातून समुदाय-आधारित पुनर्वसनमधील परिणाम वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑनलाइन सहकार्य: ऑनलाइन संगीत नेतृत्व कार्यक्रम. (International Online Collaboration to Enhance Outcomes in Community-Based Rehabilitation Through Music: The Online Music Leadership Program.)
   **लुसी बोलगर, समीर वळसंगकर, सुमती सुंदर,** आणि मेलीसा मर्फी यांचेकडून.
   लिंक: https://voices.no/index.php/voices/article/view/3729

2. सीबीआरमध्ये संगीत थेरपी-माहिती तंत्रांचा समावेश करणे: ग्रामीण भारतातील दोन मुले आणि त्यांच्या कुटुंबांसह सरावाचे अनुभव. (Incorporating Music Therapy-Informed Techniques into CBR: Experiences from Practice with two Children and their Families in Rural India.)
   लुसी बोलगर, राजू तम्मूलुरी, विवियाना तिरकी, आणि मेलीसा मर्फी यांचेकडून.

   लिंक: https://dcidj.uog.edu.et/index.php/up-j-dcbrid/article/view/642

# कम्युनिटी आधारित रिहॅबिलेशन(सीबीआर) मध्ये संगीत उपयोग




सीबीआर ध्येयानुसार सीबीआर मध्ये संगीत उपयोग केल्याने मुलांना मदत मिळते:

- कोणत्याही मदतीविना सहभाग - "स्वातंत्र्य"
- कठीण परिश्रम – “प्रेरणा”
- थेरपी करतांना मजा/उत्साह – “आनंद”
- सर्वांसोबत काम करणे – “सहकार्य”
- समुहाचा भाग बनणे – “समावेशकता”
- ऐकून घेतले जाणे– “सल्ला देणे/आवाज”
- ऐकणे आणि प्रतिसाद देणे शिकणे – “संवाद कौशल्य, अपेक्षा”
- शरीर खेळभावना जागृत करणे– “उत्तम आणि सकल चलित कौशल्य”
- दीर्घकाळासाठी खेळ/थेरपी चालू असणे – “लक्ष, सहभाग”

## सीबीआरमध्ये संगीत वापरण्यासाठी पुढील चार "नियम" आहेत

### १ मुलांचे अनुसरण करा, ते नेता असतात



### २ प्रतीक्षा करा आणि काळजीपूर्वक ऐका. मुलांसाठी काही जागा सोडा



### ३ नेहमी शब्दांचा वापर करू नका.

संगीत वापरा!




### ४ मजा करा!



Catholic Health Association of India


अधिक माहितीसाठी::
डॉ. लुसी बोगलर (bolgerl@unimelb.edu.au)
सीएचएएआयl (directorgeneral@chai-india.org)
युओएम म्युजिक थेरपीचे उत्पादन/सीएचएआय संशोधन भागीदारी २०२३

THE UNIVERSITY OF MELBOURNE

सीबीआर मध्ये संगीत वाजवा, आपण वाद्य, आपला आवाज, किंवा दोन्ही वापरू शकता.



"मिररिंग आणि मॅचिंग"म्हणजे जेव्हा मूल त्याच वेळी काय करत आहे ते आपण कॉपी किंवा नक्कल करतो
जेव्हा मूल सतत खेळत असते तेव्हा आम्ही हे करतो.



“टर्न टेकिंग” (वळण घेणे) म्हणजे जेव्हा आपण मुलांसोबत संगीतमय संभाषण करतो आणि वळण घेतो/गाणे म्हणतो.

जेव्हा मुल काहीतरी लहान खेळत असेल तेव्हा आम्ही हे करतो आणि नंतर थांबणं

सीबीआरमध्ये संगीत वाजवा. गाणी ही ओळखीची असतात आणि आराखडा, ओळखीचे संकेत, आणि संगीत निर्देश देतात.



गाण्याची लय बदलणे:

- मुलाच्या हालचालींसोबत वेळेत गाणे म्हणणे /खेळणे
- संपूर्ण क्रियाप्रक्रियेसाठी गाण्याची पुनरावृत्ती करणे किंवा सुरू ठेवणे

गाण्यांतील शब्दांमध्ये बदल:

- मुलांच्या नावाचा वापर
- शब्दांमधील सूचना बदल किंवा मुलांच्या कृतीचे वर्णन
- शब्द किंवा वाक्यांमधील बदल.
- स्पष्ट आणि साध्या शब्दांचा वापर.







गाण्यांचा आराखडा वापर:

- आम्ही नेतृत्व करतो आणि मुलं जोडली जातात
- स्पष्ट आणि स्थिरपणे गाणे म्हणणे
- वेग/आणि आवाजाची निवड जेणेकरून मुलं जोडली जातात
- मुलांचे निरीक्षण करा आणि त्यांना ऐका

या कार्याची उदाहरणे पहा

क्लिक करा किंवा स्कॅन करा

Catholic Health Association of India

अधिक माहितीसाठी: डॉलुसी बोगलर (bolgerl@unimelb.edu.au)
डॉ. लुसी बोगलर (bolgerl@unimelb.edu.au)
सीएचएआय। (directorgeneral@chai-india.org)
युओएम म्युजिक थेरपीचे उत्पादन/सीएचएआय संशोधन भागीदारी २०२३

THE UNIVERSITY OF MELBOURNE